शुक्रवार दि. २८ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३५७ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### एसआयआरच्या पुढील टप्प्यातील प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व सर्वसमावेशक ठेवा – मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम

# पुढील टप्प्यातील कामांसाठी विभागाची यंत्रणा सज्ज!

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

विशेष सखोल पुनरीक्षणाच्या पुढील टप्प्यात प्रारूप मतदार यादीच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या अर्ज, सूचना व हरकतींवर तत्परतेने कार्यवाही करण्यासाठी सक्षम यंत्रणा सज्ज ठेवावी. मतदार यादीतील नोंदींची पडताळणी, नमुना क्रमांक ६, ७ व ८ मधील अर्जांवर कार्यवाही आणि आवश्यक दुरुस्त्या नियमानुसार पूर्ण करताना प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व नागरिकाभिमुख ठेवावी, असे निर्देश मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले.

छत्रपती संभाजीनगर विभागातील विशेष सखोल पुनरीक्षणाच्या कामाचा श्री. चोक्कलिंगम यांनी स्मार्ट सिटी कार्यालयात आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, परभणी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, लातूर जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, सहआयुक्त मंजुषा मिसकर यांच्यासह संबंधित आठही जिल्ह्यांतील उपजिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक नोंदणी अधिकारी, सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

श्री. चोक्कलिंगम म्हणाले, विशेष सखोल पुनरीक्षणाच्या कामाला गती देण्यासाठी मतदार यादीची पाने आणि नोटिसांची छपाई नियोजनबद्ध पद्धतीने वेळेत पूर्ण करावी. यासाठी जिल्हानिहाय नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी विभागातील आठही जिल्ह्यांतील छपाईची कामे, उपलब्ध यंत्रसामग्री,




संबंधित संस्थांची क्षमता आणि कामाचे नियोजन यांचा त्यांनी आढावा घेतला.

प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या सूचना व अर्जांवर तातडीने कार्यवाही करण्यासाठी संबंधित यंत्रणा सक्रिय ठेवावी. एखाद्या नागरिकाचे नाव प्रारूप यादीत आढळून न आल्यास त्याची सध्याची निवासस्थिती तपासून आवश्यकतेनुसार नमुना क्रमांक ६ भरून घेऊन नियमानुसार कार्यवाही करावी. नागरिकांना प्रक्रिया व अर्जांबाबत स्पष्ट आणि सुलभ मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, असे त्यांनी सांगितले. प्रारूप मतदार यादीबाबत नागरिकांच्या शंका व सूचनांचे निराकरण करण्यासाठी निवडणूक अधिकारी आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमध्ये समन्वय ठेवावा. मतदार यादीतील नोंदींमध्ये झालेल्या बदलांबाबत नागरिकांना स्पष्ट माहिती द्यावी. तसेच नाव समाविष्ट करणे, आवश्यक दुरुस्ती करणे किंवा नियमानुसार वगळण्याच्या प्रक्रियेबाबत योग्य मार्गदर्शन करावे. यावेळी एसआयआरच्या पुढील टप्प्यात पात्र मतदारांची नावे मतदार यादीत कायम राहतील तसेच दावे व हरकतींची प्रक्रिया पारदर्शक व नियमानुसार पूर्ण होईल, यासाठी जिल्हानिहाय यंत्रणा सज्ज ठेवावी.

प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नागरिकांनी आपले नाव तपासून आवश्यक असल्यास विहित मुदतीत दावा किंवा हरकत दाखल करावी. तसेच अनमॅप्ड मतदारांच्या प्रकरणांमध्ये निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी. नोटीस बजावणे, कागदपत्रांचे संकलन आणि प्राथमिक पडताळणीसाठी स्थानिक परिस्थितीनुसार योग्य पद्धत स्वीकारावी. पात्र मतदारांचे उपलब्ध मोबाईल क्रमांक, फोटो ओळखपत्र तसेच इतर वैध ओळखपत्रांच्या माध्यमातून संपर्क व पडताळणीची प्रक्रिया सुलभ करता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. याबाबतीत इतर राज्यांमध्ये अवलंबिलेल्या चांगल्या पद्धतींचा अभ्यास करून त्यांचा अवलंब करता येईल, असे त्यांनी सांगितले. नागरिकांचे दावे, हरकती तसेच तक्रारींची तातडीने दखल घेऊन संबंधितांची आवश्यक कागदपत्रे पडताळावीत. पात्र नागरिकांची नावे मतदार यादीत अचूकपणे समाविष्ट करण्याची प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण करावी, अशी सूचना करून प्रत्येक भारतीय नागरिकाचा मतदानाचा हक्क अबाधित राखण्यासाठी निवडणूक आयोग कटिबद्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

एसआयआरच्या पहिल्या टप्प्यात निवासी स्थितीची पडताळणी करण्यात आली असून, पुढील टप्प्यात प्रारूप मतदार यादी, दावे-हरकती, सुनावणी आणि त्यावरील पुढील कार्यवाहीचे नियोजन आवश्यक आहे. नागरिकत्व असलेल्या नागरिकांना अनावश्यक त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले. मतदार नोंदणीची प्रक्रिया अधिक व्यापक करण्यासाठी नव्याने पात्र झालेल्या युवकांच्या नोंदणीसाठी विशेष जनजागृती करावी. महाविद्यालये, कनिष्ठ महाविद्यालये आणि मतदार साक्षरता मंचांच्या माध्यमातून जनजागृती उपक्रम राबवावेत. निवडणूक प्रक्रियेबाबत राजकीय पक्ष, प्रसारमाध्यमे आणि समाजमाध्यमांच्या माध्यमातून नागरिकांना अचूक माहिती उपलब्ध करून द्यावी, असेही त्यांनी सांगितले.

प्रारंभी सहाय्यक आयुक्त श्रीमती मिसकर यांनी छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, लातूर, हिंगोली, *(पान २ वर)*

## न्यायालय हे नाटकाचे व्यासपीठ नाही! ११ वर्षे न्यायालयीन वेळ वाया घालवणाऱ्या अशील व वकिलास प्रत्येकी ५ लाखांचा दंड

### *सर्वोच्च न्यायालयाचा मोठा दणका*

**जालना - प्रतिनिधी**

''न्यायालय म्हणजे लोकांच्या मनोरंजनासाठी उभारलेले नाट्यगृह किंवा प्रेक्षागृह नव्हे. स्वतःच्या चुका झाकण्यासाठी आणि सूड उगवण्यासाठी न्यायव्यवस्थेचा गैरवापर सहन केला जाणार नाही,'' अशा अत्यंत कडक शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने अशिलाच्या गोपनीयतेचा भंग करणाऱ्या एका वकिलाला आणि त्याच्या माजी महिला अशिलाला जोरदार फटकारले आहे. तब्बल ११ वर्षे न्यायव्यवस्थेचा अमूल्य वेळ वाया घालवल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने दोन्ही पक्षकारांवर प्रत्येकी ५ लाख रुपयांचा दंड ठोठावून सर्व याचिका फेटाळून लावल्या आहेत. हे प्रकरण मुंबईतील महिला अशील रेहाना खान आणि वकील रिझवान सिद्दीकी यांच्यातील वादाशी संबंधित आहे. संबंधित महिलेने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याविरुद्ध केलेल्या तक्रारीसंदर्भात वकिलाकडे दिलेली गोपनीय माहिती व वैयक्तिक संभाषणांचे रेकॉर्डिंग या वकिलाने टीव्ही वाहिन्यांवर उघड केले होते. बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या शिस्तपालन समितीने व्यावसायिक गैरवर्तणुकीचा ठपका ठेवत वकील रिझवान सिद्दीकी यांची सनद दोन वर्षांसाठी निलंबित केली होती आणि दंड ठोठावला होता. या शिक्षेविरुद्ध वकिलाने आव्हान दिले होते, तर संबंधित महिलेने वकिलाविरुद्ध कायमस्वरूपी निलंबन व २ कोटी रुपयांच्या भरपाईची मागणी करत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती विजय बिष्णोई यांच्या खंडपीठाने बार कौन्सिलचा निर्णय कायम ठेवला. खंडपीठाने स्पष्ट केले की, अशिलाशी मतभेद झाले तरीही वकिलाने गोपनीयतेचा भंग करणे कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय ठरू शकत नाही. त्याचवेळी मूळ तक्रारदार महिलेनेही अनेक तथ्ये लपवून न्यायालयात स्वच्छ हाताने दाद मागितली नसल्याचे ताशेरे न्यायालयाने ओढले. ज्या गरजू पक्षकारांना खरोखरच न्यायाची गरज आहे, त्यांचा तब्बल ११ वर्षांचा वेळ या दोघांनी खोट्या नाट्यात वाया घालवला, असे नमूद करत न्यायालयाने दोघांनाही सर्वोच्च न्यायालय विधी सेवा समितीकडे प्रत्येकी ५ लाख रुपयांचा दंड चार आठवड्यांत जमा करण्याचे आदेश दिले आहेत. कायदेशीर नीतिमत्तेचा आणि गोपनीयतेचा मोठा विजय : ॲड. महेश धन्नावत या महत्त्वपूर्ण निकालावर प्रतिक्रिया व्यक्त करताना ॲड. महेश धन्नावत यांनी सांगितले की, ''सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय वकिली व्यवसायातील व्यावसायिक नैतिकता आणि गोपनीयतेच्या तत्त्वाला अधिक बळकट करणारा *(पान २ वर)*

# संजय शर्मा खून प्रकरणात दोन संशयित ताब्यात!

### दोन तासांत पोलिसांची धडाकेबाज कारवाई; हाफिज हत्या प्रकरणातील जुन्या वैमनस्यातून खून झाल्याची प्राथमिक माहिती

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील जुना मोंढा परिसरातील जय माँ हॉटेलसमोर गुरुवारी दुपारी धारदार शस्त्राने वार करून ४० वर्षीय संजय शर्मा यांची हत्या करण्यात आल्याने शहरात खळबळ उडाली. भरदिवसा आणि वर्दळीच्या ठिकाणी घडलेल्या या हत्येनंतर सदर बाजार पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत अवघ्या दोन तासांत दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे हत्येच्या तपासाला महत्त्वपूर्ण दिशा मिळाली आहे.

गुरुवारी (दि. २७) दुपारी सुमारे १ ते १.३० वाजेच्या दरम्यान संजय शर्मा यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले आणि त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच सदर बाजार पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. काही वेळातच पोलिसांनी उपलब्ध माहिती व धागेदोऱ्यांच्या आधारे संशयितांचा शोध सुरू केला.

**दोन तासांत दोघे ताब्यात**



घटनेनंतर पोलिसांनी परिसरातील हालचाली, प्रत्यक्षदर्शींकडून मिळालेली माहिती तसेच उपलब्ध पुराव्यांच्या आधारे तपास सुरू केला. सदर बाजार पोलिसांच्या डीबी पथकाने संशयितांचा माग काढत अवघ्या दोन तासांत दोघांना ताब्यात घेतले.

ताब्यात घेण्यात आलेल्या संशयितांची नावे शेख नफीस शेख हबीब आणि शेख शहबाज शेख अश्फाक अशी असल्याची प्राथमिक माहिती आहे. दोघांची पोलिसांकडून कसून चौकशी सुरू असून, हत्येचा संपूर्ण घटनाक्रम आणि या घटनेमागील कारणांचा तपास केला जात आहे.

पोलिस तपासात समोर आलेल्या प्राथमिक माहितीनुसार, या हत्येमागे जुन्या हत्येच्या प्रकरणातून निर्माण झालेले वैमनस्य असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

सन २०२४ मध्ये जामवाडी शिवारातील एका हॉटेलमध्ये शेख हाफिज यांची हत्या झाली होती. या प्रकरणात संजय शर्मा यांच्यावर आरोपी म्हणून गुन्हा दाखल असल्याची माहिती पोलिसांकडून समोर आली आहे. न्यायालयाकडून जामीन मिळाल्यानंतर शर्मा बाहेर होते. याच जुन्या हत्येच्या प्रकरणातून निर्माण झालेल्या वैमनस्यातून शर्मा यांच्यावर हल्ला करण्यात आल्याची प्राथमिक माहिती तपासात समोर येत आहे. शेख हाफिज यांच्या हत्येचा बदला घेण्याच्या उद्देशातून त्यांचा भाऊ शेख नफीस शेख हबीब आणि मावसभाऊ शेख शहबाज शेख अश्फाक यांनी शर्मा यांच्यावर हल्ला केल्याचा पोलिसांचा प्राथमिक संशय आहे. मात्र, हत्येमागील नेमका हेतू आणि आरोपींचा सहभाग तपासाअंतीच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे प्राथमिक तपासातील माहितीच्या आधारे अंतिम निष्कर्ष काढणे घाईचे ठरणार आहे.

ताब्यात घेतलेल्या दोन्ही संशयितांना पोलिसांनी पुढील तपासासाठी घटनास्थळी नेले. हत्येच्या वेळी नेमका घटनाक्रम कसा घडला, हल्ला कोणत्या ठिकाणी झाला, आरोपींची हालचाल कशी होती आणि हल्ल्यात कोणते शस्त्र वापरण्यात आले, याबाबत माहिती मिळविण्यासाठी पोलिसांनी घटनास्थळाची *(पान २ वर)*

### चंदनझिरा एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन

# गुंडगिरी व अमली पदार्थांच्या व्यवहारांविरोधात कठोर कारवाई करा – आमदार अर्जुनराव खोतकर





**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील चंदनझिरा एमआयडीसी परिसरातील वाढती औद्योगिक व नागरी वर्दळ, तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेची गरज लक्षात घेता चंदनझिरा एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या भव्य नवीन इमारतीच्या बांधकामाचा भूमिपूजन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शिवसेना उपनेते तथा जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते विधिवत पूजा करून या नवीन इमारतीच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. चंदनझिरा एमआयडीसी परिसराचा सातत्याने विस्तार होत असून औद्योगिक वसाहतीसोबतच लगतच्या नागरी भागातही लोकसंख्या आणि नागरिकांची वर्दळ वाढत आहे. या पार्श्वभूमीवर स्वतंत्र, आधुनिक आणि सुसज्ज पोलिस ठाण्याची इमारत उभारली जाणे ही परिसराच्या दृष्टीने महत्त्वाची बाब मानली जात आहे. नवीन इमारतीमुळे नागरिकांना पोलिस सेवा अधिक सुलभपणे उपलब्ध होण्यास मदत होणार असून, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासनाला आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध होणार आहेत.

नवीन पोलिस ठाण्याच्या माध्यमातून नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण, गुन्हे प्रतिबंधक कारवाई, तपास, प्रशासकीय कामकाज तसेच नागरिकांशी संबंधित विविध पोलिस सेवा अधिक प्रभावीपणे राबविता येणार आहेत. वाढत्या औद्योगिक परिसराच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी या इमारतीचा महत्त्वपूर्ण उपयोग होणार आहे.

भूमिपूजन *(पान २ वर)*

## पावसाच्या दीर्घ खंडामुळे पिके करपण्याच्या मार्गावर; तात्काळ पंचनामे करून पीकविमा व नुकसानभरपाई द्या

### *राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांना निवेदन; शेतकऱ्यांच्या प्रश्नावर प्रशासनाचे लक्ष वेधले*

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर विधानसभा मतदारसंघात यावर्षी अत्यल्प पाऊस तसेच मागील एक महिन्यापेक्षा अधिक काळ पडलेल्या पावसाच्या दीर्घ खंडामुळे कापूस, सोयाबीन व इतर खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. अनेक ठिकाणी पिके करपण्याच्या अवस्थेत असून शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आज मा. उपविभागीय अधिकारी, परतूर यांना निवेदन देऊन तात्काळ पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना पीकविमा व शासकीय नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात आली.



परतूर विधानसभा मतदारसंघातील परतूर, मंठा तसेच ग्रामीण भागात यावर्षी पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिले आहे. सुरुवातीला पिकांची उगवण समाधानकारक झाली असली तरी त्यानंतर पावसाने मोठी दडी मारल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला आहे. विशेषतः सोयाबीनची पाने वाळत असून झाडांची वाढ खुंटली आहे. शेंगा भरण्याच्या महत्त्वाच्या काळात पाण्याअभावी उत्पादनात मोठी घट होण्याची भीती निर्माण झाली आहे. कापूस पिकाचीही अवस्था चिंताजनक असून अनेक ठिकाणी पिके करपण्याच्या मार्गावर आहेत.

शेतकऱ्यांनी बी-बियाणे, खते, औषधे *(पान २ वर)*

# बहीण भावाच्या पवित्र नात्याचा सण ; राखी पौर्णिमा

आज श्रावण पौर्णिमा आजचा दिवस संपूर्ण देशात राखी पौर्णिमा म्हणून साजरा केला जातो. राखी पौर्णिमा हा हिंदू संस्कृतीतील एक महत्वाचा सण मानला जातो. बहीण भावाच्या पवित्र नात्याला बंधनात बांधणारा हा सण. या दिवशी बहीण आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करते. भाऊ देखील आपल्या लाडक्या बहिणीला तिच्या आवडीची भेट देऊन तिला तिच्या सुरक्षेची हमी देतो त्यामुळे या सणाची बहीण भाऊ दोघेही आतुरतेने वाट पाहत असतात. विशेषतः जे बहीण भाऊ एकमेकांपासून लांब असतात त्यांना या निमित्ताने एकमेकांची भेट घेता येते. आपली सुख दुःख एकमेकांना सांगता येतात आणि जुन्या बालपणीच्या आठवणींना उजाळा मिळतो. राखी पौर्णिमा या सणाला पौराणिक इतिहास आहे. पुरातन काळात जेंव्हा स्त्री स्वतःला असुरक्षित मानत होती तेंव्हा ती अशा व्यक्तीस राखी बांधून भाऊ मानत असे जो तिची रक्षा करील. इंद्राच्या राणीने आपल्या मनगटावर एक धागा बांधला होता. ज्याच्या समर्थ्याने वज्रासुर राक्षसाचा पराभव केला तेव्हापासून त्याची स्मृती म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत सुरू झाली असे मानले जाते. तसेच ऐतिहासिक काळात चित्तोडच्या राणी कर्मवतीने हुमायून बादशहाला राखी पाठवली व हुमायून बादशहाने देखिल आपल्या या बहिणीचे परकीय आक्रमणापासून संरक्षण केले. राखी पौर्णिमेचे असे अनेक दाखले पुराणात आणि इतिहासात पाहायला मिळतात. राखी पौर्णिमेला रक्षा बंधन असेही म्हणतात. राखी बांधण्याचा अर्थ आपण त्या व्यक्तीच्या बंधनात स्वतःला वाहून घेऊन तिच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारतो. राखी पौर्णिमेच्या दिवशी राखीचा धागा बांधून भाऊ बहिणीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारतो म्हणूनच या सणाला रक्षा बंधन असेही म्हणतात. रक्षा करणे जबाबदारी स्वीकारणे. या दिवशी भाऊ आपल्या बहिणीची जबाबदारी स्विकारतो. वडीलांच्या पश्चात भाऊ आपल्या बहिणीची सर्व परिस्थितीत जबाबदारी स्वीकारतो तर आईच्या पश्चात भावास आईचे निरपेक्ष प्रेम देणे, काळजी घेणे याची जबाबदारी बहीण स्वीकारते म्हणून याला रक्षा बंधन असे म्हणतात. या दिवशी बहीण आणि भाऊ एका पवित्र बंधनात बांधले जातात म्हणून या सणाला बहीण भावाच्या पवित्र नात्याच्या सण असे म्हटले जाते.

राखी बंधनाच्या या पवित्र सणातून मित्रत्व, स्नेह व परस्पर प्रेम वृद्धिंगत होते. आपल्या संस्कृतीत स्त्रीला देवी मानले जाते. अशी ही देवतुल्य स्त्री म्हणजे बहीण आपल्या भावाला राखी बांधण्यापूर्वी त्याच्या कपाळावर टिळा लावते. हा टिळा फक्त मस्तकाच्या आदरचा नसून भावाच्या मस्तकातील सदविचार व सदबुद्धि जागृत राहण्यासाठीची ही पूजा असते. राखीचा धागा हा नुसताच सुताचा धागा नसून ते शील, स्नेह, पवित्रतेचे रक्षण करणारे, सतत संयमी ठेवणारे पुरुषार्थाचे बंधन आहे. ह्या एव्हढ्याशा धाग्याने कित्येक मने जुळून येतात. त्यांना भावनांचा ओलावा मिळतो व मन प्रफुल्लित होतो. एकमेकांना जोडणारा हा सण सामाजिक ऐक्याची भावना जागृत ठेवणारा आहे. रक्ताच्या नात्याव्यतिरिक्त आपल्या मनाप्रमाणे नाती जोडण्यास ह्या सणामुळे समाजास वाव मिळतो. ज्याला सख्खी बहीण नाही किंवा जिला सख्खा भाऊ नाही ती बहीण मानस भावाला राखी बांधते आणि बहीण भावाचे पवित्र नाते वृद्धिंगत करते असा हा बहीण भावाच्या पवित्र नात्याचा सणाच्या सर्व भारतीयांना शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## पान १ व ४ वरुन...

### पुढील टप्प्यातील...

धाराशिव व नांदेड या सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आणि त्यांच्या पथकांनी निर्धारित कालावधीत एसआयआरच्या पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण केल्याचे सांगितले.

यावेळी विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या कामकाजाची माहिती दिली. हाऊस-टू-हाऊस सर्व्हे, एन्यूमरेशन फॉर्मचे वितरण व संकलन, मतदार नोंदींचे मॅपिंग व डिजिटलायझेशन तसेच अनमॅप्ड, अनुपस्थित, स्थलांतरित, मृत आणि दुबार नोंद असलेल्या मतदारांची पडताळणी याबाबत जिल्हानिहाय सद्यस्थिती त्यांनी सादर केली. पुढील टप्प्यातील नियोजनाची माहितीही त्यांनी दिली.

**३१ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी**

एसआयआरच्या सुधारित वेळापत्रकानुसार ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत नागरिकांना दावे व हरकती दाखल करता येतील. दावे-हरकतींवरील नोटीस बजावण्याची व ते निकाली काढण्याची प्रक्रिया २९ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार असून, ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे.

### संजय शर्मा...

पाहणी केली. यावेळी पोलिसांनी परिसरातील परिस्थितीची पाहणी करून तपासाच्या दृष्टीने आवश्यक माहिती संकलित केली. उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी माध्यमांशी बोलताना प्रकरणाची प्राथमिक माहिती दिली.

संजय शर्मा यांच्या हत्येसाठी वापरण्यात आलेले धारदार शस्त्र कुठे आहे, याचाही पोलिसांकडून शोध घेतला जात आहे. तसेच या हत्येच्या कटात आणखी कोणी सहभागी होते का, हल्ल्यापूर्वी आरोपी आणि मृत व्यक्ती यांच्यात काही संपर्क किंवा वाद झाला होता का, याचा तपास सुरू आहे. पोलिसांकडून संशयितांची कसून चौकशी केली जात असून, त्यांच्या जबाबातून हत्येपूर्वीचा आणि हत्येनंतरचा संपूर्ण घटनाक्रम स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. परिसरातील उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक पुरावेही तपासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहेत. जुना मोंढा हा शहरातील अत्यंत वर्दळीचा आणि व्यापारी परिसर आहे. अशा ठिकाणी दुपारच्या वेळी धारदार शस्त्राने तरुणाची हत्या झाल्याने नागरिक आणि व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेनंतर काही काळ घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. शहरातील मध्यवर्ती भागात दिवसाढवळ्या झालेल्या या हत्येमुळे पोलिसांच्या गस्तीसह कायदा व सुव्यवस्थेबाबतही नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. गुन्हेगारी प्रवृत्तींवर आळा घालण्यासाठी पोलिसांनी अधिक प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. विशेष म्हणजे, जालना शहरात सलग दोन दिवसांत खुनाच्या दोन घटना घडल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. नागेवाडी परिसरात दोन दिवसांपूर्वी तरुणाच्या हत्येची घटना घडली होती. त्यानंतर आता जुना मोंढ्यासारख्या वर्दळीच्या परिसरात भरदिवसा संजय शर्मा यांची हत्या झाल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. गुन्हेगारी घटनांची पुनरावृत्ती रोखण्यासाठी पोलिसांनी संवेदनशील भागात गस्त वाढविणे, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई करणे तसेच जुन्या वैमनस्यातून निर्माण होणाऱ्या वादांवर लक्ष ठेवणे आवश्यक असल्याची चर्चा शहरात सुरू आहे. संजय शर्मा यांच्या हत्येचे नेमके कारण काय? २०२४ मधील शेख हाफिज हत्या प्रकरणाशी या हत्येचा थेट संबंध आहे का? हल्ल्यामागे पूर्वनियोजित कट होता का? हत्येसाठी वापरलेले शस्त्र कुठे आहे? या घटनेत आणखी कोणाचा सहभाग आहे का? या सर्व प्रश्नांची उत्तरे पोलिसांच्या पुढील तपासातून समोर येणार आहेत. अवघ्या दोन तासांत दोन संशयितांना ताब्यात घेऊन पोलिसांनी तपासाला वेग दिला असला तरी, या प्रकरणातील संपूर्ण घटनाक्रम आणि हत्येमागील सूत्रधार निश्चित करण्याचे आव्हान अद्याप कायम आहे. सदर बाजार पोलिसांकडून सुरू असलेल्या तपासात आणखी महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता असून, या थरारक हत्याकांडाचे संपूर्ण गूढ कधी उलगडते, याकडे जालना शहराचे लक्ष लागले आहे.

### न्यायालय हे नाटकाचे...

आहे. वकील आणि अशील यांच्यातील नाते हे पूर्णपणे विश्वासावर आधारलेले असते. कोणताही वाद निर्माण झाला तरी अज्ञानाने किंवा रागाच्या भरात अशिलाची गोपनीय माहिती सार्वजनिक व्यासपीठावर आणणे हे कायदेविषयक नीतिमत्तेच्या विरोधात आहे. तसेच, न्यायालयांचा अमूल्य वेळ वैयक्तिक सूडबुद्धीसाठी वाया घालवणाऱ्यांना ५ लाखांचा दंड ठोठावून न्यायालयाने दिलेला हा संदेश न्यायव्यवस्थेचा मान राखण्यासाठी अत्यंत आवश्यक आणि ऐतिहासिक आहे.

### पावसाच्या दीर्घ खंडामुळे....

मशागत, मजुरी व डिझेलसाठी मोठा खर्च केला असून अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून शेती केली आहे. वर्षभराच्या मेहनतीनंतर पीक हातात येण्याच्या काळातच पावसाने पाठ फिरवल्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा हाता-तोंडाशी आलेला घास हिरावून जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन महसूल व कृषी विभागाच्या संयुक्त पथकांमार्फत गावनिहाय व शेतनिहाय प्रत्यक्ष पाहणी करून तात्काळ पंचनामे करण्यात यावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. पंचनाम्यांमध्ये पिकांची सद्यस्थिती, पावसातील खंड, पिकांचे झालेले नुकसान आणि अपेक्षित उत्पादनातील घट यांची वस्तुनिष्ठ नोंद करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली.

ज्या शेतकऱ्यांनी पीकविमा भरलेला आहे, त्यांना नियमानुसार पीकविमा नुकसानभरपाई मिळण्यासाठी संबंधित विमा कंपनी व यंत्रणेला तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात यावेत. तसेच पूर्वी अस्तित्वात असलेले पीकविमा नुकसान संदर्भातील ०४ ट्रिगर पुन्हा लागू करून पात्र शेतकऱ्यांना त्याचा लाभ देण्यात यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

तसेच शासनाच्या लागू निकषांनुसार पात्र नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती/पीक नुकसानभरपाई तातडीने मंजूर करावी, नुकसानग्रस्त भागात विशेष पथके नियुक्त करावीत, शेती कर्जाबाबत उपलब्ध कर्जसवलत व कर्ज पुनर्गठन योजनांचा लाभ मिळवून द्यावा आणि पीकविमा व नुकसानभरपाईची प्रक्रिया सुलभ व जलद करावी, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय परतूर विधानसभा मतदारसंघात मंजूर झालेल्या घरकुलांच्या लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळण्यासाठी संबंधित गावांमध्ये ग्रामसभा आयोजित करून पात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात यावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब गाडगे,मंठा तालुकाध्यक्ष दिलीपराव चव्हाण,आशिष भैय्या जेथलिया,इंद्रजित घनवट,हाजी रेहमत,नगरसेवक बाबुराव हिवाळे, राजेश खंडेलवाल, शाकेर खतीब, मंगेश डहाळे,मंजुळदास सोळंके,वसीम सय्यद, सिद्धू अंभुरे, दत्ता अंभुरे, गणेश ढवळे, विष्णुपंथ तनपुरे,सुरेश जिजा सवणे,बंडु भुबर,रामकिसन रुपनर,शाकेरभाई मापेगावकर,दिपक कळदाते,दत्ता अंभुरे, अनिल आंबेकर, कम्मू पठाण, मोसीन बागवान, दिपक उबाळे, दिपक मुजमुले, सुरेश भंडारी,जनार्धन काळे, योगेश डोणे,कांतराव सोळंके, डॉ. केशरखाने, संकेत अंभुरे, अजीम पठाण, विशाल पवार, रफिक कुरेशी, सोनू धुमाळ,अमेर पठाण,सौरभ अंभुरे, राहुल अंभुरे, एकनाथ बोनगे, विठ्ठल राऊत, शोएब सिद्दीकी, सचिन बोंबले, अमोल अंभुरे, विकास खुळे, अशोक खरात, अंकुश मिठे, श्रीरंग मोगरे,दत्ता लिपने,मयूर लिपने, अंबादास डवले, उद्धव पवार,मुरतूजा कल्याणकर,अजिम कुरेशी, विठ्ठलराव बागल, जगन दवणे, परमेश्वर उबाळे,प्रवीण डुकरे, शुभम कठोरे, राजेभाऊ धुमाळ, मनोज कऱ्हाळे,विष्णु मचाले,राजू कुरेशी,तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोमवारी मुंबईत उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार व कृषीमंत्री दत्तामामा भरणे यांची भेट घेणार दरम्यान, परतूर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या पीक नुकसानीचा प्रश्न शासनाच्या स्तरावर तातडीने मांडण्यासाठी सोमवारी मुंबई येथे राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई अजितदादा पवार तसेच कृषीमंत्री मा. दत्तामामा भरणे यांची भेट घेऊन त्यांना स्वतंत्र निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती नितिन सुरेशकुमार जेथलिया यांनी दिली. पावसाच्या दीर्घ खंडामुळे निर्माण झालेली परिस्थिती, कापूस, सोयाबीन व इतर खरीप पिकांचे झालेले नुकसान, तात्काळ पंचनामे, पीकविमा नुकसानभरपाई तसेच पूर्वी अस्तित्वात असलेले ०४ ट्रिगर पुन्हा लागू करण्याची मागणी याबाबत शासनस्तरावर तातडीने निर्णय घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे नितिन जेथलिया यांनी सांगितले. ''परतूर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना या संकटाच्या काळात शासनाकडून तातडीची मदत मिळवून देणे ही आमची प्राथमिकता आहे. शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी शासनस्तरावर ठोस पाठपुरावा करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहोत,'' असे नितिन सुरेशकुमार जेथलिया यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या या गंभीर प्रश्नाची शासनाने तातडीने दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य ती आर्थिक मदत, पीकविमा नुकसानभरपाई व आवश्यक शासकीय मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

### गुंडगिरी व अमली...

.सोहळ्यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी विधिवत पूजा केली. नवीन पोलिस ठाण्याच्या माध्यमातून परिसरातील नागरिकांना अधिक सक्षम आणि तत्पर पोलिस सेवा मिळेल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी बोलताना आमदार अर्जुनराव खोतकर यांनी जालना शहरातील वाढत्या गुंडगिरीच्या प्रवृत्ती तसेच तरुण पिढीमध्ये वाढत चाललेल्या नशेच्या प्रमाणाबाबत चिंता व्यक्त केली. शहरातील गुंड टोळ्या आणि अमली पदार्थांच्या व्यवहारांना आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासनाने अधिक सक्षमपणे मोर्चेबांधणी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. ''शहरात गुंडगिरी करणाऱ्या प्रवृत्तींना खाकीचा वचक दाखवून कायद्याचे राज्य अधिक मजबूत करण्याची गरज आहे,'' असे सांगत खोतकर यांनी गुन्हेगारी प्रवृत्तींविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घ्यावी, असे आवाहन केले.

तरुण पिढी अमली पदार्थांच्या विळख्यात जाणार नाही, यासाठी पोलिस प्रशासनाने प्रतिबंधात्मक कारवाईसोबतच अमली पदार्थांची विक्री व पुरवठा करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. शहरातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी पोलिस यंत्रणेने अधिक प्रभावीपणे काम करण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी नमूद केले. पोलिस दलाच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करताना आमदार खोतकर म्हणाले की, पोलिस दलाच्या माध्यमातून समाजात कायद्याचा वचक निर्माण केला जातो. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस अधिकारी व कर्मचारी दिवस-रात्र आपले कर्तव्य बजावत असतात. मुंबईतील ताज हॉटेलवरील दहशतवादी हल्ल्याचा संदर्भ देत त्यांनी नागरिकांच्या संरक्षणासाठी अनेक पोलिस कर्मचाऱ्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिल्याचे सांगितले. त्यांच्या शौर्याचा आणि बलिदानाचा सदैव अभिमान राहील, असेही त्यांनी नमूद केले. जालना शहराचा वेगाने होत असलेला विस्तार लक्षात घेता केवळ चंदनझिरा परिसरापुरतीच नव्हे, तर संपूर्ण शहरातील पोलिस यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे आमदार खोतकर यांनी सांगितले.

सदर बाजार पोलिस स्टेशन, तालुका पोलिस स्टेशन आणि कदीम जालना पोलिस स्टेशन या पोलिस ठाण्यांच्या नवीन इमारतींसाठी जागेसह प्रस्ताव मंजूर करून घेण्याची जबाबदारी आपण घेत असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमास आमदार नारायण कुचे, तेघवीर सिंह संधू (भा.पो.से.), शिवसेना जिल्हासंपर्क प्रमुख भास्कर आंबेकर, युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, शिवसेना शहरप्रमुख विष्णु पाचफुले, विक्रम साळी (भा.पो.से.), अनंत कुलकर्णी (भा.पो.से.), पोलिस निरीक्षक किरण बिडवे, तसेच घनश्याम गोयल, संतोष मोहिते, बाळासाहेब पवार, कमलेश खरे, दर्शना झोल, अमोल ठाकूर, संध्या देठे, रिमा खरात, अजित छाबडा, पांडुरंग डोंगरे, अर्जुन गेही, गणेश सुपारकर, रितेश पंचारिया, संतोष रासवे, अंबादास चितेकर, आनंद धोत्रे, दिनेश दैने, सुनील बोर्डे, बाला परदेसी, मुज्जू खान, राम सतकर, अरुण अग्रवाल, धीरेन मेहरा, सतीश गोयल, गोपाल मानधना, डी. बी. सोनी, नंदू जांगडे, दीपक भुरेवाल, महेंद्र भक्कड, दत्ता काकडे, सुनील आदमाने, राधाकिसन दाभाडे, शांतीलाल राऊत यांच्यासह पोलिस अधिकारी, कर्मचारी, व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. चंदनझिरा एमआयडीसी पोलिस ठाण्याची ही नवीन इमारत पूर्ण झाल्यानंतर परिसरातील पोलिस प्रशासनाला आधुनिक सुविधा मिळणार असून, वाढत्या औद्योगिक व नागरी क्षेत्राच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावीपणे हाताळण्यास मदत होणार आहे.

### मोकाट जनावरांविरोधात...

धोका निर्माण करणाऱ्या पशुपालकांविरोधात प्रशासन कठोर भूमिका घेणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. महानगरपालिकेने केवळ जनावरे पकडण्यापुरती कारवाई मर्यादित न ठेवता संबंधित मालकांवर दंडात्मक तसेच कायदेशीर फौजदारी कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. वारंवार सूचना देऊनही जनावरे मोकाट सोडणाऱ्या पशुपालकांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे. मोकाट जनावरांमुळे एखादा अपघात घडल्यास त्यातून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे पशुपालकांनी आपली जबाबदारी ओळखून जनावरे रस्त्यावर सोडू नयेत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**कोंडवाड्यातील खर्चही मालकांकडून वसूल**

महानगरपालिकेच्या कारवाईत पकडलेली जनावरे परत घेऊन जाण्यासाठी संबंधित मालकाला निर्धारित प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. कोंडवाड्यात जनावरांची देखभाल करण्यासाठी झालेला खर्च तसेच लागू होणारा दररोजचा दंड संबंधित मालकाकडूनच वसूल केला जाणार आहे.

त्यामुळे जनावरे मोकाट सोडून नंतर ती पकडली गेल्यास अतिरिक्त आर्थिक भुर्दंड सहन करावा लागू शकतो. पशुपालकांनी ही बाब गांभीर्याने घेऊन प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर जालना शहरातील बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. खरेदीसाठी नागरिक मोठ्या संख्येने बाहेर पडतात. त्यातच मुख्य रस्ते व चौकांमध्ये मोकाट जनावरांचा वावर असल्यास वाहतूक कोंडीची समस्या अधिक गंभीर होऊ शकते. सणासुदीच्या काळात वाहतूक सुरळीत राहावी, नागरिकांना सुरक्षितपणे ये-जा करता यावी आणि संभाव्य अपघात टाळता यावेत, यासाठी महानगरपालिकेची ही मोहीम महत्त्वाची ठरणार आहे. शहरातील कचराकुंड्या आणि कचरा टाकण्याच्या ठिकाणी अन्नाच्या शोधात जनावरे मोठ्या प्रमाणात जमा होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे कचरा रस्त्यावर पसरतो आणि स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होतो. अशा ठिकाणीही जनावरे मोकाट सोडू नयेत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनीही जनावरांना सार्वजनिक ठिकाणी खाद्य टाकताना किंवा रस्त्यावर अन्नपदार्थ टाकताना काळजी घ्यावी, जेणेकरून मोकाट जनावरांची गर्दी होणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवणे, अपघातांचा धोका कमी करणे आणि नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे ही प्रशासनासोबतच नागरिकांचीही सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे पशुपालकांनी जनावरे रस्त्यावर मोकाट सोडू नयेत तसेच नागरिकांनीही प्रशासनाच्या मोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

मोकाट जनावरांचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी जनावरांच्या मालकांनी जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. महानगरपालिकेची विशेष मोहीम प्रत्यक्षात किती प्रभावी ठरते आणि कारवाईनंतर शहरातील रस्त्यांवर मोकाट जनावरांचा वावर कितपत कमी होतो, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### ना. राधाकृष्ण विखे...

मराठवाड्यातील मराठा आरक्षण हा आंदोलनाचा प्रमुख आणि एकमेव मुद्दा आहे. मात्र या मुद्द्याऐवजी केवळ कुणबी नोंदींच्या एकूण आकड्यांचा खेळ सुरू आहे. त्यामुळे हैदराबाद संस्थान मधील १९२१ आणि १९३१ च्या

गॅझेट मध्ये ओबीसी गटात स्वतंत्र मराठा जातीची नोंद असून ही कुणबी मूळ कुळ नसलेल्या या मराठ्यांना नाहक कुणबी प्रमाणपत्र शोधण्यात अडकवून दिशाभूल होत आहे, असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे . मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर तुकड्या-तुकड्यांत तोडगा काढण्याची भाषा करून समाजाला संभ्रमात ठेवले जात असल्याचा आणि दिशाभूल केली जात असल्याचा आरोपही त्यांनी

सध्याच्या आंदोलक नेत्यावर केला आहे . हैदराबाद संस्थानातील मराठा समाजाला त्यांच्या मराठा जातीच्या ( कुणबी नव्हे) ऐतिहासिक नोंदींच्या आधारे न्याय मिळणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. ना राधाकृष्ण विखेपाटील यांच्या हैदराबाद गॅझेट शासन आदेश आणि त्याची दोन वेळेस निर्गमित केलेली फसवी मानक कार्यपद्धती कार्यप्रक्रियांमुळे हैदराबाद संस्थान मधील त्याच कृषक गटात नोंदणी असलेली मराठा जात बाहेर फेकली गेली असून त्यामुळे मराठवाड्यातील मराठा जातीच्या आरक्षणाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा झाला असल्याचा दावा करत,मराठवाड्यातील सकल मराठा समाजाने या संपूर्ण घडामोडींचा गांभीर्याने विचार करावा, असे आवाहन डॉ. लाखेपाटील यांनी केले. हैदराबाद गॅझेटमधील कृषक गटातील मराठा समाजाच्या नोंदींच्या आधारे ओबीसी आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी व्यापक जनआंदोलन उभारण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आता समाजाने जागरूक होऊन आपल्या हक्कासाठी निर्णायक लढा उभारला पाहिजे. अन्यथा पुन्हा एकदा फसवणुकीच्या राजकारणात समाजाला अडकवले जाईल, असा इशारा त्यांनी दिला. हैदराबाद गॅझेट, मराठा आरक्षण, कुणबी नोंदी आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न यावरून राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापण्याची चिन्हे असून, डॉ. लाखेपाटील यांच्या या वक्तव्यामुळे आरक्षणाच्या आंदोलनाला नवा राजकीय आणि सामाजिक मुद्दा मिळण्याची शक्यता आहे.

### योगानंद माध्यमिक...

अभय काळुंके, अशोक अंभुरे, किशोर कद्रे, अविनाश राठोड, विशाल यंदे, नारायण सेठ गायकवाड, संदीप पाटील, बाळासाहेब कोरडे, दुर्गेश पोद्दार, बापू मिसाळ, दीपक ढोले, सोमनाथ उदेवाल, रोशन बगडिया, विनोद बागल, सचिन तेलगड, अरुण वाघमारे, डॉ. राजेश जावळे, निलेश बगडिया, किरण बल्लमखाणे, संजय व्यवहारे, दिगंबर मुजमुले, अरुण काळे, राज कांगणे, मुकुंद शेपाळ, संतोष टेकाळे, अनिल टेकाळे, किरण चेपटे, संतोष वाघमारे यांच्यासह इतर मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

### उत्कृष्ट सार्वजनिक...

जाणार आहेत. स्पर्धेचे अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख ७ सप्टेंबर २०२६ असून ही स्पर्धा विनामूल्य आहे. नोंदणीकृत व परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ या स्पर्धेत सहभागी होऊ शकणार आहेत. विजेत्या मंडळांना जिल्हास्तरावर प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकांनी गौरविले जाणार आहे. यासोबतच, महाराष्ट्रातील घरगुती गणपतीचे दर्शन, सार्वजनिक गणपतीचे दर्शन व विविध प्रसिद्ध गणेश मंदिरातील गणपतींचे लाईव्ह दर्शन अकादमीच्या वतीने तयार करण्यात आलेल्य पोर्टलद्वारे घरबसल्या घेता येणार आहे. आपल्या घरगुती अथवा सार्वजनिक गणेशोत्सवाचे छायाचित्र या पोर्टलद्वारे विनामूल्य प्रसिद्ध करता येईल. याकरिता अधिकाधिक मंडळांनी व कुटुंबांनी आपल्या गणपतीची छायाचित्रे या पोर्टलद्वारे प्रसिद्ध, करावीत असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी केले आहे.

### मराठा-कुणबी...

आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य करणार आहेत. तसेच हेल्पलाईनवर प्राप्त होणाऱ्या नागरिकांच्या शंका व अडचणींचे योग्य प्रकारे निराकरण करून, आवश्यकतेनुसार संबंधित विभाग/अधिकाऱ्यांशी समन्वय साधून कार्यवाही करण्याबाबत मार्गदर्शन करणार आहेत. याकरीता जिल्ह्यातील नागरिकांनी प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे व पुरावे घेऊन हेल्पलाइन कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जात प्रमाणपत्र तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र संदर्भात माहिती, मार्गदर्शन अथवा अडचणींसाठी हेल्पलाइन क्रमांक ०२४८२-२२३१३२ वर संपर्क साधवा असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी केले आहे.

### रोजगार हा तरुणांना...

विकास, तंत्रज्ञान, उद्योग, महिला, युवा सक्षमीकरण, क्रीडा, नागरी सुविधा आणि सामाजिक विकास यासारख्या विषयावर लोकप्रतिनिधींनी केवळ प्रतिक्रिया न देता ठोस धोरणात्मक भूमिका मांडली पाहिजे असे सांगितले. या बैठकीत जालना महानगर पालिकेचे युवा नगरसेवक अश्विन भास्करराव अंबेकर

म्हणाले की, सध्या तरुणांसमोर रोजगाराचा मोठा प्रश्न आहे. राज्यात उद्योगांचे मुंबई, पुणे, ठाणे, छ.संभाजीनगर अशा भागात केंद्रीकरण झाल्यानेही जालना जिल्ह्यासारख्या जिल्ह्यातील तरुणांच्या हाताला रोजगार मिळणे अवघड झाले आहे. त्यामुळे जालन्यासारख्या विकासात मागे असलेल्या जिल्ह्यातही मोठे उद्योग उभारणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांनीही आवर्जून नगरसेवक अश्विन अंबेकर यांच्याशी आस्थेवाईकपणे संवाद साधला.

याबैठकीत युवा लोकप्रतिनिधी मांडलेले प्रश्न अडचणी आणि त्यांचे म्हणणे ही जाणून घेतले त्यांच्या मतांना आणि सूचनांना सकारात्मकपणे समजून घेत विविध

विषयावर पुढे काय करता येईल याबाबत सविस्तर चर्चा केली. त्यांनी मांडलेल्या प्रश्नावर योग्य ती कारवाई कशी करता येईल याची माहिती जाणून

घेतली. यावेळी युवा लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टेंभुर्णीच्या विकासासाठी आलेला कोट्यवधींचा निधी गेला कुठे?

## सात लाखांची व्यायामशाळा, रस्ते-नाल्या कुठे? ऐतिहासिक ग्रामसभा वादळी; मागील पाच वर्षांचा लेखाजोखा सादर करण्याची ग्रामस्थांची मागणी

**टेंभुर्णी । दत्ता देशमुख**

टेंभुर्णी गावाच्या विकासासाठी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी येत असल्याचे कागदोपत्री दिसत असताना प्रत्यक्षात गावातील मूलभूत सुविधांची अवस्था बिकट का आहे? विकासासाठी आलेला निधी नेमका कुठे खर्च झाला, असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केल्याने टेंभुर्णीची ग्रामसभा चांगलीच वादळी ठरली. मागील पाच वर्षांचा ग्रामपंचायतीचा संपूर्ण आर्थिक व विकासकामांचा लेखाजोखा ग्रामस्थांसमोर सादर करावा, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली.

मंगळवारी गावातील मध्यवस्तीत असलेल्या चमनवर ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. ग्राम विस्तार अधिकारी बळीराम वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच विस्तार अधिकारी व्ही. टी. जायभाये यांच्या उपस्थितीत ही ग्रामसभा झाली. विशेष म्हणजे ग्रामसभा गावात घेण्यात यावी, यासाठी युवक शुभम मुळे यांनी उपोषण केले होते. सोशल मीडियावर सातत्याने पाठपुरावा करून ग्रामसभा गावात घेण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते. त्यामुळे ग्रामसभेला युवकांसह महिलांची आणि ग्रामस्थांची मोठी गर्दी झाली.

गावातील युवकांनी ग्रामसभेत विविध विकासकामांबाबत प्रश्नांची सरबत्ती केली. गावात व्यायामशाळेसाठी लाखो रुपयांचा, विशेषतः सात लाख रुपयांचा निधी खर्च झाल्याचे सांगितले जात असताना प्रत्यक्षात व्यायामशाळा कुठे आहे, असा सवाल उपस्थित करण्यात आला. निधी मंजूर होऊनही सुविधा



अस्तित्वात नसेल तर हा निधी नेमका कुठे गेला, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली.

सोशल मीडिया तसेच विकास निधीशी संबंधित अ‍ॅपवर कोट्यवधी रुपयांच्या निधीची माहिती दिसत असताना प्रत्यक्षात गावातील रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा आणि स्वच्छतेसारख्या मूलभूत समस्या कायम असल्याचे ग्रामस्थांनी निदर्शनास आणून दिले.

ग्रामसभेत तब्बल सुमारे ४२ विविध प्रश्न व मागण्या मांडण्यात आल्या. त्यामध्ये खडकपूर्णा पाणीपुरवठा योजनेची चौकशी, गावातील अंतर्गत नाल्यांची साफसफाई, खराब रस्त्यांची दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, ग्रामपंचायत कार्यालय जुन्या गावात स्थलांतरित करणे, पोस्ट ऑफिससह राष्ट्रीयीकृत बँका जुन्या गावात आणणे, बाहेरून जाणाऱ्या एसटी बस गावात आणणे, पाळणाघराची चौकशी करणे आदी प्रश्नांचा समावेश होता. गावातील अतिक्रमणांचा प्रश्न सोडविणे, बाजार हाटाचा ठेका गावातील व्यक्तीलाच देणे, देशी दारू व बारची दुकाने बंद करण्याबाबत कार्यवाही करणे, तसेच गावातील विविध मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याची मागणीही करण्यात आली.

गावातील बसस्थानकाचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित असून, बसस्थानक परिसरातील नाल्यांची साफसफाई होत नसल्याने अस्वच्छता वाढत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. रस्त्यांवरील घाण, खराब रस्ते, बाजार परिसरातील कायमस्वरूपी अस्वच्छता यामुळे नागरिक त्रस्त असल्याचेही बैठकीत मांडण्यात आले.

महिला व मुलांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृहांची आवश्यकता असून, मुख्य वस्तीत आवश्यक ठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करण्याची मागणीही करण्यात आली. नळाला नियमित पाणी मिळत नसल्याने नागरिकांच्या अडचणी वाढल्या आहेत. खडकपूर्णा पाणीपुरवठा योजनेची पाईपलाईन अद्याप अपूर्ण असून, वारंवार आश्वासने मिळूनही प्रत्यक्षात पाणीपुरवठ्याचा प्रश्न सुटलेला नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.

ग्रामसभेच्या सुरुवातीला गावात नव्याने मंजूर झालेल्या ८३६ घरकुल लाभार्थ्यांच्या यादीचे वाचन करण्यात आले. यादीतून पात्र असूनही वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांनी पुढील आठ दिवसांत आपले प्रस्ताव ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावेत, असे सांगण्यात आले.

टेंभुर्णी गाव नगरपंचायतीसाठी पात्र असल्याचा मुद्दाही ग्रामसभेत उपस्थित करण्यात आला. गावाची वाढती लोकसंख्या आणि विस्तार लक्षात घेता टेंभुर्णी ग्रामपंचायतीचे तातडीने नगरपंचायतीत रूपांतर करावे, असा ठराव मांडण्यात आला.

गावाच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी येत असल्याचे विविध माध्यमांमधून आणि विकास निधीच्या अ‍ॅपवरून दिसते. मात्र, ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर होत नसतील तर निधीच्या उपलब्धतेचे आणि खर्चाचे नियोजन नेमके कसे केले जाते, असा सवालही ग्रामस्थांनी उपस्थित केला.

''विकासासाठी कोट्यवधी रुपये येत असल्याचे दाखविले जाते; मग गावातील रस्ते, नाल्या, पाणी, स्वच्छता आणि पथदिव्यांची अवस्था अशी का?'' असा थेट प्रश्न युवकांनी उपस्थित केला. या प्रश्नावर समाधानकारक उत्तर न मिळाल्याने ग्रामसभेत काही काळ वातावरण तापले.या ग्रामसभेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गावातील प्रश्न मांडले. पाणी, स्वच्छता, रस्ते, सार्वजनिक स्वच्छतागृहे, पथदिवे आणि बाजारपेठेतील अस्वच्छता यांसह विविध समस्यांकडे महिलांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. युवकांसोबत महिलांचा सक्रिय सहभाग असल्याने ग्रामसभेला विशेष महत्त्व प्राप्त झाले. ग्रामसभेला मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित राहिल्याने टेंभुर्णी पोलिस ठाण्याच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# कमलताई जामकर महिला महाविद्यालयाची 'युवा प्रभा २०२६'मध्ये दमदार कामगिरी

## देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक; विद्यार्थिनींच्या कलागुणांना मिळाले यश



**परभणी । प्रतिनिधी**

युवा भारत परभणीच्या वतीने आयोजित 'युवा प्रभा २०२६' अंतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. विद्यार्थिनींच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. देशभक्तीपर समूहगीत सादरीकरणातून विद्यार्थिनींनी देशप्रेम, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश प्रभावीपणे मांडला. त्यांच्या सादरीकरणाला परीक्षकांकडून दाद मिळत प्रथम क्रमांक मिळाला. या विजेत्या समूहात विजया मोरे, कोमल जाधव, कोमल डहाळे, श्रेया कुलकर्णी, गायत्री भांडे आणि मुक्ता कच्छवे या विद्यार्थिनींचा सहभाग होता. समूहगीताला तबल्याची साथ ज्ञानेश्वर पाथरकर यांनी केली. या विद्यार्थिनींना स्पर्धेसाठी प्राध्यापक डॉ. पल्लवी कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विभागप्रमुख डॉ. रवींद्र इंगळे यांनीही विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी मिळविलेल्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष हेमंतराव जामकर, सचिव विजयराव जामकर, उपाध्यक्ष अ‍ॅड. किरणराव सुभेदार, कोषाध्यक्ष डॉ. अभय सुभेदार, प्राचार्य डॉ. संजयजी टाकळकर आणि डॉ. रामचंद्र भिसे यांनी विजेत्या विद्यार्थिनी, मार्गदर्शक प्राध्यापक आणि सहभागी सर्वांचे अभिनंदन केले.

महाविद्यालयातील विद्यार्थिनींना शिक्षणासोबतच कला, सांस्कृतिक आणि विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले जात असून, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. 'युवा प्रभा २०२६'मधील या यशामुळे महाविद्यालयातील विद्यार्थिनी आणि शिक्षकवर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# जालना जिल्ह्यासह मराठवाड्यात कृत्रिम पाऊस पाडा

### खरीप पिके धोक्यात; सोयाबीन, कापूस, मका, तूर, मूग व उडदाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आमदार अर्जुन खोतकरांची मुख्यमंत्र्यांकडे तातडीची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिके धोक्यात आली असून, शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. या पार्श्वभूमीवर जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुन खोतकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जालना जिल्ह्यासह मराठवाड्यात तातडीने कृत्रिम पाऊस पाडण्याचे नियोजन करण्याची मागणी केली आहे. याबाबत त्यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून सध्याची गंभीर परिस्थिती निदर्शनास आणून दिली आहे. पिके वाचविण्यासाठी आता विलंब न करता शासनाने कृत्रिम पावसाच्या प्रयोगासाठी आवश्यक नियोजन करावे, अशी आग्रहाची मागणी त्यांनी केली आहे.

सरकारी आकडेवारीपेक्षा प्रत्यक्ष परिस्थिती गंभीर आमदार खोतकर यांनी पत्रात म्हटले आहे की, जालना जिल्ह्यासह मराठवाड्यात यंदा सरासरीच्या तुलनेत सुमारे २० टक्के कमी पाऊस झाल्याची सरकारी आकडेवारी आहे. मात्र, प्रत्यक्षात सर्वदूर आणि समान स्वरूपाचा पाऊस झालेला नसल्याने केवळ सरासरीच्या आकडेवारीवरून परिस्थितीचे अचूक मूल्यमापन करता येणार नाही. जालना जिल्ह्यात सुमारे २३० मिलिमीटर पावसाची नोंद झाली असली तरी प्रत्यक्ष परिस्थिती त्यापेक्षा गंभीर असल्याचा दावा खोतकर यांनी केला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा निम्मादेखील पाऊस झालेला नसल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. तसेच काही ठिकाणी पर्जन्यमापक यंत्रांमध्ये तांत्रिक बिघाड आणि चुकीच्या नोंदी होत असल्याचे यापूर्वी निदर्शनास आल्याने सरकारी आकडेवारी आणि प्रत्यक्ष परिस्थिती यामध्ये तफावत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. ३० जुलैनंतर दमदार पावसाची प्रतीक्षा जालना जिल्ह्यात ३० जुलैनंतर एकही मोठा पाऊस झालेला नसल्याचे आमदार खोतकर यांनी पत्रात नमूद केले आहे.

# जालना तालुका ग्रामीण काँग्रेसची आढावा बैठक; आगामी निवडणुकांसाठी संघटन मजबूत करण्याचे आवाहन

## खासदार डॉ. कल्याण काळे व जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे यांचे मार्गदर्शन; एसआयआर, पक्षविस्तार आणि जनतेच्या प्रश्नांवर चर्चा

**जालना । प्रतिनिधी**

जालना तालुका ग्रामीण काँग्रेस कमिटीच्या वतीने तालुकाध्यक्ष कृष्णा पडुळ यांच्या अध्यक्षतेखाली पक्षाची आढावा बैठक उत्साहात पार पडली. आगामी जिल्हा परिषद व ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासोबतच एसआयआर (मतदार यादी पुनरावलोकन) प्रक्रियेबाबत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रश्नांवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.




या बैठकीस खासदार डॉ. कल्याणराव काळे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, ज्येष्ठ नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. खासदार डॉ. कल्याणराव काळे व जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना पक्ष संघटन आणि आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. जिल्हा परिषद व ग्रामपंचायत निवडणुका लक्षात घेऊन बूथनिहाय संघटन मजबूत करणे, गावागावांत कार्यकर्त्यांचे जाळे अधिक सक्षम करणे आणि जनतेशी सातत्याने संपर्क ठेवणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

एसआयआर प्रक्रियेत मतदारांच्या नोंदी तपासणे आणि पात्र मतदारांचे नाव मतदार यादीत कायम राहण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतही कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीत संघटनात्मक बांधणी, पक्षविस्तार आणि आगामी निवडणुकांचे नियोजन यासोबतच शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि ग्रामीण भागातील विविध प्रश्नांवर चर्चा झाली. स्थानिक पातळीवरील समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवून त्या सोडविण्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी सक्रिय भूमिका घ्यावी, असे आवाहन करण्यात आले.

काँग्रेसची विचारधारा आणि जनहिताची भूमिका अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी गावागावांत संपर्क वाढवावा, असा संदेश बैठकीत देण्यात आला.

बैठकीस उपाध्यक्ष राजेंद्र राख, अ.सं. उपाध्यक्ष बदर चाऊस, महानगर जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे, माजी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर भांदरगे, राम कुऱ्हाडे, सुभाष कोळकर, अविनाश चव्हाण, अशोक उबाळे, राजेंद्र गोरे, रघुवीर गुडे, देवराज डोंगरे, सचिन कचरे, सुनील चौधरी, दांडगे ताई, सोपानराव तिरुखे, नारायण काका शिंदे, गणेशराव खरात, लाला पाटील लकडे, समाधान शेजुळ, राजुभाऊ साबळे, मोहनराव जाधव, बबूभाई, गौतम भलमोडे, सुधाकर अण्णा ढोकळे, श्रीहरी साबळे, राम पवार, गणेश शिरसाठ, काकासाहेब शिरसाठ, बाळूभाऊ वाहुळे, विशाल वाहुळे, संजयभाऊ धनगड, नारायणराव काळे, राम मोरे, रंगनाथराव काळे, राजू झिने, रंगनाथ शिंदे, गंगारामजी मेंद, गणेश डोंगरे, दीपक तिडके, शिवाजी डोंगरे, गजानन भोकरे, फकीरभाई मोहिते, शिवाजी मोहिते, माऊली इंगोले, रामभाऊ पवार, संतोष राठोड, विक्रम चव्हाण, लक्ष्मण मोरे, विजय राठोड, सुरेश कदम, अजिमभाई, विनोद खरात, कृष्णा सोमधाने, रमेशराव काळकुंबे, रविभाऊ जाधव, शेख मोईन भाई, शिवदास म्हस्के, गजानन जाधव, संदीप वाघ, रशीदभाई, रहीम तांबोळी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण वाढेकर यांनी केले. आभार प्रदर्शन सोपानराव तिरुखे यांनी केले. बैठकीस जालना तालुक्यातील काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जालन्यात गौरी-गणपती उत्सवासाठी 'महालक्ष्मी कोठी' निर्मितीला वेग

## पारंपरिक तांबे, पितळ व स्टीलच्या कोठ्यांना मागणी

**जालना । प्रतिनिधी**

गौरी-गणपती उत्सवाला आता काही दिवसच शिल्लक राहिल्याने जालना शहरातील बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः नलगल्ली परिसरात गौरी-गणपतीच्या आगमनाची तयारी जोरात सुरू असून, पारंपरिक महालक्ष्मी देवीच्या कोठ्या आणि मुखवटे तयार करण्याच्या कामाला मोठा वेग आला आहे. कारागीर रात्रंदिवस मेहनत घेऊन विविध आकारांच्या आणि आकर्षक नक्षीकाम केलेल्या महालक्ष्मी कोठ्या तयार करण्यात व्यस्त आहेत. गौरी-गणपती उत्सवामध्ये महालक्ष्मीची स्थापना करण्याची परंपरा अनेक कुटुंबांमध्ये श्रद्धेने पाळली जाते. त्यामुळे उत्सव जवळ येताच महालक्ष्मीच्या कोठ्या, मुखवटे तसेच पूजेसाठी आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी महिलांची बाजारपेठेत गर्दी वाढू लागली आहे.

नलगल्ली परिसरातील कारागीर पारंपरिक पद्धतीने तांबे, पितळ आणि स्टील या धातूंपासून महालक्ष्मीच्या कोठ्या तयार करत आहेत. कोठ्यांवर केलेले बारकाईने केलेले नक्षीकाम, पारंपरिक कलाकुसर आणि आकर्षक रचना यामुळे त्यांना विशेष मागणी आहे. काही कोठ्यांवर फुलांची नक्षी, पारंपरिक वेलबुट्टी आणि अन्य कलाकुसर करण्यात आली आहे. ग्राहकांच्या पसंतीनुसार विविध आकार आणि डिझाईनमध्ये कोठ्या उपलब्ध करून दिल्या जात असल्याचे चित्र आहे.

महालक्ष्मीच्या पितळी मुखवट्यांना यंदाही भाविकांकडून मोठी मागणी असल्याचे दिसून येत आहे. आकर्षक चेहऱ्याची ठेवण, बारकाईने केलेले नक्षीकाम आणि पितळेचा पारंपरिक लुक यामुळे हे मुखवटे महिलांचे विशेष आकर्षण ठरत आहेत.

नलगल्लीतील दुकानांमध्ये विविध प्रकारचे मुखवटे विक्रीसाठी ठेवण्यात आले असून, ते पाहण्यासाठी आणि खरेदी करण्यासाठी महिलांची गर्दी होत आहे. काही ग्राहकांकडून आपल्या घरातील परंपरेनुसार विशिष्ट आकार आणि रचनेचे मुखवटे पसंत केले जात आहेत. गौरी-गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मागणी वाढल्याने कारागिरांनी गेल्या काही दिवसांपासून उत्पादनाला वेग दिला आहे. वेळेत ग्राहकांची मागणी पूर्ण करण्यासाठी अनेक कारागीर दिवसरात्र मेहनत घेत आहेत. तयार झालेले मुखवटे आणि कोठ्या दुकानांमध्ये आकर्षक पद्धतीने मांडण्यात येत असून, त्यामुळे नलगल्ली परिसराला उत्सवी स्वरूप प्राप्त झाले आहे. महालक्ष्मीच्या कोठ्या आणि मुखवटे तयार करण्याची परंपरा जालन्यात अनेक वर्षांपासून सुरू आहे. काळानुसार ग्राहकांच्या आवडी बदलत असल्या तरी पारंपरिक धातूंचा वापर आणि कलाकुसर आजही कायम आहे. पारंपरिक स्वरूपाला आधुनिक डिझाईनची जोड देत कारागीर ग्राहकांच्या पसंतीनुसार नवनवीन नमुने तयार करत आहेत. या पारंपरिक व्यवसायामुळे स्थानिक कारागिरांच्या कौशल्याला वाव मिळत असून, गौरी-गणपती उत्सवाच्या निमित्ताने त्यांच्या हातातील कलाकुसरीला बाजारपेठही मिळत आहे. गौरी-गणपती उत्सवासाठी घराघरांत साफसफाई, सजावट आणि पूजेच्या साहित्याची खरेदी सुरू झाली आहे. त्यातच महालक्ष्मीच्या कोठ्या आणि पितळी मुखवट्यांची खरेदी करण्यासाठी बाजारपेठेत वाढलेली गर्दी उत्सवाच्या उत्साहाची साक्ष देत आहे. पारंपरिक श्रद्धा आणि कारागिरांच्या कलाकुसरीच्या संगमातून जालन्यातील गौरी-गणपती उत्सवाची तयारी यंदाही मोठ्या उत्साहात सुरू असल्याचे चित्र आहे.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त 'खेळो इंडिया संवाद युवा कनेक्ट' उत्साहात संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या पार्श्वभूमीवर मेरा युवा भारत, जालना यांच्या सहकार्याने जी.ई.एस. महाविद्यालय, जालना येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'खेळो इंडिया संवाद युवा कनेक्ट' या विशेष कार्यक्रमाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, क्रीडाप्रेमी तसेच युवा वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युवकांशी व्हिडिओ संवाद साधून केलेले मार्गदर्शन. आपल्या संवादातून त्यांनी युवकांना खेळाकडे केवळ मनोरंजन म्हणून न पाहता जीवनाचा महत्त्वाचा भाग म्हणून स्वीकारण्याचे आवाहन केले. नियमित क्रीडा सहभागामुळे शरीर सुदृढ राहण्यासोबतच शिस्त, आत्मविश्वास, नेतृत्वगुण, संघभावना आणि संघर्ष करण्याची क्षमता विकसित होते, असे त्यांनी सांगितले. युवकांनी खेळाच्या माध्यमातून स्वतःचा सर्वांगीण विकास साधावा आणि देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असा संदेशही त्यांनी दिला. जी.ई.एस. महाविद्यालयात आयोजित या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अत्रेहोत्री, उपप्राचार्य डॉ. उमेश मोगले, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुमंत बिक्कड, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. किशोर कुमार तापडिया, डॉ. हेमंत वर्मा यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच विविध विभागांचे प्राध्यापक, क्रीडा विभागाचे पदाधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक आणि युवक मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान युवकांना क्रीडा क्षेत्रातील विविध संधी, खेळाडू म्हणून घडताना येणारी आव्हाने आणि क्रीडेमुळे व्यक्तिमत्त्व विकासाला मिळणारी चालना याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संवाद उत्साहाने ऐकला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयी नव्या उमेदीची भावना निर्माण झाली. कार्यक्रमानंतर खो-खोच्या राष्ट्रीय खेळाडू गायत्री शिंदे तसेच इतर खेळाडूंनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी आपल्या क्रीडा प्रवासातील अनुभव, सरावातील सातत्य, स्पर्धेतील आव्हाने आणि यशासाठी आवश्यक असलेली मेहनत याविषयी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना 'खेळा, निरोगी राहा आणि देशाच्या विकासात योगदान द्या' हा संदेश देण्यात आला. क्रीडा क्षेत्रात उपलब्ध असलेल्या संधींची माहिती मिळाल्याने युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# मोकाट जनावरांविरोधात महानगरपालिकेची विशेष मोहीम

## सोमवारपासून रस्त्यावर उतरणार विशेष पथक; जनावरे कोंडवाड्यात, मालकांवर दंडासह फौजदारी कारवाईचा इशारा

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील रस्त्यांवर मोकाट फिरणाऱ्या जनावरांमुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन जालना महानगरपालिकेने आता मोकाट जनावरांविरोधात कडक भूमिका घेतली आहे. सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ पासून महानगरपालिकेतर्फे मोकाट जनावरे पकडण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान रस्त्यावर मोकाट आढळणाऱ्या जनावरांना तातडीने ताब्यात घेऊन कोंडवाड्यात जमा करण्यात येणार असून, संबंधित पशुपालकांवर दंडात्मक कारवाईसोबतच कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा महानगरपालिकेने दिला आहे. आगामी सणासुदीचा कालावधी लक्षात घेता शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठा आणि चौकांमध्ये नागरिकांची व वाहनांची मोठी वर्दळ वाढणार आहे. अशा परिस्थितीत रस्त्यांवर बसलेली किंवा अचानक वाहनांसमोर येणारी जनावरे अपघातास कारणीभूत ठरू शकतात. त्यामुळे नागरिकांची सुरक्षितता आणि वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी ही विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे.




महानगरपालिकेने शहरातील सर्व पशुपालकांना आपली पाळीव जनावरे स्वतःच्या जागेत अथवा गोठ्यात बांधून ठेवण्याचे आवाहन केले आहे. सार्वजनिक रस्ते, मुख्य चौक, पदपथ, बाजारपेठा तसेच कचराकुंड्यांच्या परिसरात जनावरे मोकाट सोडण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. काही ठिकाणी जनावरे रस्त्याच्या मध्यभागी किंवा कडेला बसलेली असल्याने वाहनचालकांना अचानक ब्रेक लावावा लागतो. विशेषतः रात्रीच्या वेळी कमी प्रकाशात मोकाट जनावरे वाहनचालकांना दिसत नसल्याने अपघाताचा धोका वाढतो. त्यामुळे जनावरांच्या मालकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून आपली जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधून ठेवावीत, असे आवाहन करण्यात आले आहे

३१ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या विशेष मोहिमेत महानगरपालिकेचे पथक शहरातील विविध भागांत फिरून रस्त्यावर मोकाट आढळणारी जनावरे ताब्यात घेणार आहे. पकडण्यात आलेली जनावरे कोंडवाड्यात जमा करण्यात येतील.

या कारवाईदरम्यान जनावरांच्या मालकांची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला जाणार असून, संबंधित मालकांकडून नियमांनुसार दंड वसूल केला जाणार आहे. जनावरे मोकाट सोडून नागरिकांच्या जीवितास आणि वाहतुकीस (पान २ वर)

# ना. राधाकृष्ण विखे हे कुणबीच आणि म्हणूनच हैदराबाद गॅझेट मधील नोंदणीकृत मराठा जातीवर अन्याय!

## विजय वडेट्टीवार यांच्या वक्तव्याचा दाखला देत डॉ. संजय लाखेपाटील यांचा घणाघाती आरोप

**जालना - प्रतिनिधी**

ना. राधाकृष्ण विखे हे कुणबीच आहेत, असा दावा काँग्रेस नेते आणि ना राधाकृष्ण विखेपाटील यांचे कौटुंबिक स्नेही आ विजय वडेट्टीवार यांच्या वक्तव्याचा दाखला देत सकल मराठा समाज व मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक डॉ. संजय लाखेपाटील यांनी केला आहे. हैदराबाद गॅझेटच्या आधारे मराठवाड्यातील मराठा समाजाला न्याय मिळवून देण्याऐवजी मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उपसमितेचे अध्यक्ष ना राधाकृष्ण विखेपाटील यांच्या कडून दिशाभूल केली जात असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. २ सप्टेंबर २०२५ रोजीच्या हैदराबाद गॅझेटसंदर्भातील शासन निर्णयाच्या माध्यमातून निश्चित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीवर डॉ. लाखेपाटील यांनी तीव्र आक्षेप नोंदविला होता त्यांच्या मते, तत्कालीन हैदराबाद संस्थान मधील मराठवाड्यातील मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मूळ मागणीला बगल देऊन वेगळ्याच मुद्द्यांभोवती आरक्षण आंदोलन चर्चा हेतुपुरस्सर फिरवली जात आहे.

मागील वर्षी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या मराठा आरक्षण गोलमेज परिषदेतून आपण याबाबत वैधानिक भूमिका मांडली होती आणि मुंबई उच्च न्यायालयात सुद्धा या विषयी आपली



हस्तक्षेप याचिका प्रलंबित असून सातत्याने तीच भूमिका मांडत असल्याचे त्यांनी सांगितले. आता विखे पाटील यांचे राजकीय सहकारी विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या वक्तव्यामुळे या प्रकरणातील 'सत्य' समोर आल्याचा दावा त्यांनी केला. हैदराबाद संस्थानातील १९२१ आणि १९३१ च्या नोंदींमध्ये 'कृषक' गटात कुणबी शिवाय मराठा समाजाची स्वतंत्र नोंद असल्याचा दावा करत डॉ. लाखेपाटील यांनी या नोंदींच्या आधारेच हैदराबाद संस्थान मधील मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडविण्याची मागणी केली. मात्र सध्या ५८ लाख नोंदींच्या मुद्द्यावर भर देऊन मराठवाड्यातील मूळ प्रश्न बाजूला सारला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. हैदराबाद संस्थानातील कृषक (ओबीसी ) गटातील मराठा समाजाची स्वतंत्र जात म्हणून असलेली नोंद आणि त्यावर आधारित मराठ्यांचा जात म्हणूनच ओबीसी गटात समावेश हा (पान २ वर)

# योगानंद माध्यमिक विद्यालयातील ९९ च्या बॅचमधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा संपन्न

## वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या मित्रांनी दिला जुन्या आठवणींना उजाळा

**परतूर - प्रतिनिधी**

योगानंद माध्यमिक विद्यालय, परतूर येथील इयत्ता दहावीच्या १९९९ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा छत्रपती संभाजीनगर येथील हॉटेल लेमन ट्री येथे आनंदी वातावरणात पार पडला. तब्बल सात तास रंगलेल्या या गेट-टुगेदर मध्ये जुन्या आठवणींना उजाळा देत मित्रांनी मनमोकळ्या गप्पा, हास्यविनोद आणि जीवनातील विविध अनुभवांची देवाणघेवाण केली.



शाळेच्या वर्गखोल्यांपासून सुरू झालेली मैत्रीची सुंदर वाटचाल अनेक वर्षांनंतर पुन्हा एकदा एकत्र आली. काळ बदलला, प्रत्येकाने आपापल्या क्षेत्रात वेगवेगळ्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या, जीवनाची दिशा बदलली; मात्र बालपणीच्या मैत्रीतील आपलेपणा, जिव्हाळा आणि प्रेम आजही तितकेच कायम असल्याची सुखद अनुभूती या स्नेहमेळाव्यात सर्वांना आली.

यावेळी प्रत्येक मित्राने शाळेनंतरच्या जीवनप्रवासातील विविध अनुभव, आपल्या क्षेत्रातील यश, संघर्ष तसेच आयुष्यातील सुख-दुःखाचे प्रसंग मनमोकळेपणाने एकमेकांसोबत शेअर केले. मित्रांनी एकमेकांच्या यशाचे मनापासून कौतुक व अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. जुन्या आठवणींना उजाळा देताना शाळेतील गंमती-जमती, मित्रांसोबत घालवलेले अविस्मरणीय क्षण आणि बालपणीच्या आठवणींनी वातावरण भावूक तसेच आनंदी झाले.

सात तासांचा स्नेहमेळावा; आठवणी मात्र आयुष्यभरासाठी! अशी भावना व्यक्त करत मित्रांनी भविष्यातही अशाच प्रकारे नियमितपणे एकत्र येण्याचा संकल्प केला. या स्नेहमेळाव्यामुळे अनेक वर्षांनंतर पुन्हा एकदा जुन्या मित्रांच्या नात्याला नव्या आठवणींची किनार मिळाली. या स्नेहमेळाव्यास राहुल लोणीकर यांच्यासह घनश्याम दायमा (पान २ वर)

# लोकशाही दिनाचे ७ सप्टेंबर रोजी आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दि. ७ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. ज्या अर्जदाराने तालूकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही, अशा अर्जदाराचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी कार्यालय यांनी कळविले आहे.

लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्वी, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत. तसेच लोकशाही दिनात द्यावयाच्या अर्जाचा विहित नमुना ://.. या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

# उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेत जिल्ह्यातील गणेश मंडळांना सहभागी होण्याच आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६ आयोजित करण्यात आली आहे. यावर्षी या स्पर्धेचा विस्तार राज्यस्तरासोबत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्यात आलेला असून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना विविध स्तरांवर पारितोषिके जिंकण्याची संधी उपलब्ध आहे. स्पर्धेचे अर्ज अकादमीच्या संकेतस्थळावर ://..., या ऑनलाईन पोर्टलद्वारे स्वीकारण्यात येणार असून, अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख सोमवार, दि.७ सप्टेंबर, २०२६ निश्चित करण्यात आली आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातील अधिकाधिक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सहभागी व्हावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी केले आहे.

या महोत्सवांतर्गत महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा राज्य, जिल्हा, तालुका या तीनही स्तरावर होणार आहे. या स्पर्धेचे अर्ज ://...,या पोर्टलद्वारे ऑनलाईन स्वरूपात स्वीकारले (पान २ वर)

# चमनचा राजा गणेश मंडळाची कार्यकारिणी जाहीर



**जालना । प्रतिनिधी**

चमनचा राजा गणेश मंडळाची यंदाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. मंडळाच्या अध्यक्षपदी अमर राजेजाधव यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी सतीश मगर व राज पिछाडे, कोषाध्यक्षपदी विक्रम आगलावे, सचिवपदी सोनाजी पाटील नन्नवरे पाटील, तर सहसचिवपदी कैलास जैस्वाल यांची नियुक्ती करण्यात आली.

कार्यकारिणी जाहीर करताना मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते. आगामी गणेशोत्सव उत्साहात व विविध सामाजिक उपक्रमांसह साजरा करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# रोजगार हा तरुणांना भेडसावणारा मोठा प्रश्न, जालन्यासारख्या जिल्ह्यातही नवीन उद्योग उभारावेत : अश्विन भास्करराव अंबेकर

**जालना - प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते मा. श्री.एकनाथजी शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेनेत २० ते ३० वयोगटातील

निवडून आलेली युवा लोकप्रतिनिधी, विविध संस्था व समित्यांचे सदस्य तसेच महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि सहकार क्षेत्रातील युवा पदाधिकारी यांची महत्वाची बैठक मुंबई येथे संसदरत्न युवा खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी योगेश कदम, सिद्धेश कदम, पक्ष प्रवक्त्या शायना एन.सी., खा.आनंदपरांजपे, सचिव भाऊसाहेब चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती. तर जालना जिल्ह्यातून महापालिकेचे युवा नगरसेवक अश्विन आंबेकर यांची उपस्थिती



होती. या बैठकीत सर्व युवा लोकप्रतिनिधीशी खासदार डॉ.शिंदे यांनी मनमोकळा संवाद साधला. साधला. यावेळी त्यांनी सांगितले कि, आपल्या पदाचा उपयोग लोकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडण्यासाठी कसा करता येईल याचा सातत्याने विचार केला पाहिजे व यावर विशेष भर दिला. आजच्या काळात राजकारण केवळ प्रश्न मांडण्यापुरते मर्यादित राहता कामा नये. तर आपल्या भागातील नागरिकांच्या समस्या समजून घेणे त्यावर अभ्यासपूर्ण उपाय सुचवणे आणि त्या उपायांची प्रभावी अंमलबजावणी करून घेणे ही युवा लोकप्रतिनिधींची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. करिता प्रत्येकाने आपल्या मतदारसंघाचा आपल्या शहराचा आणि आपल्या समाजाचा सखोल अभ्यास करावा. तसेच पॉलिसी मेकिंगमध्ये तरुणांचा सहभाग अधिक प्रभावी झाला पाहिजे. असे सांगून बदलत्या काळानुसार रोजगार, शिक्षण, कौशल्य (पान २ वर)

# मराठा-कुणबी प्रमाणपत्रांसाठी जालना जिल्हाधिकारी कार्यालयात हेल्पलाइन कक्ष

**जालना - प्रतिनिधी**

मराठा समाजातील नागरिकांना मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळविण्याच्या प्रक्रियेत मार्गदर्शन व आवश्यक सहकार्य मिळावे, यासाठी जालना जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतंत्र हेल्पलाइन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. शासनाच्या निर्देशानुसार हा कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून, नागरिकांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे स्थापन करण्यात आलेल्या हेल्पलाइन कक्षाच्या माध्यमातून मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जात प्रमाणपत्र तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया, कागदपत्रे व पुराव्यांबाबत नागरिकांना मार्गदर्शन केले जाणार आहे.

हेल्पलाइन कक्षासाठी नव्याने नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयाने जाहीर केली आहे. यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार (गृह) परमेश्वर शिंदे, तसेच महसूल सहाय्यक संदिप इंगळे यांची नव्याने नियुक्ती करण्यात आली आहे..

नागरिकांना जात प्रमाणपत्र मिळविताना आवश्यक असलेल्या पुराव्यांची माहिती उपलब्ध करून देणे, अर्जाची प्रक्रिया समजावून सांगणे, उपलब्ध अभिलेखांमधून आवश्यक नोंदी शोधण्यास मदत करणे तसेच अर्जदारांच्या अडचणींचे योग्य प्रकारे निराकरण हेल्पलाइन कक्षामार्फत करण्यात येणार आहे. यामध्ये विशेषतः उपलब्ध अभिलेखांमध्ये कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा किंवा कुणबी जातीच्या नोंदी आढळल्यास त्याबाबत आवश्यक मार्गदर्शन नागरिकांना केले जाणार आहे. तसेच संबंधित नोंदी व पुराव्यांच्या आधारे पात्र नागरिकांना प्रमाणपत्र मिळविण्याच्या प्रक्रियेत सहकार्य व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाने नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत हेल्पलाइन कक्षात उपस्थित राहून, नागरिकांकडून कुणबी जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर करणे, उपलब्ध अभिलेखांची नोंद घेणे, आवश्यक माहिती उपलब्ध करून देणे तसेच सेवे संबंधी बाबींमध्ये (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.